महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई यांना तात्पुरती व्यवस्था म्हणून एमटीएनएल, पवई येथील दुसरा, तिसरा, चौथा व सहावा मजला, भाडेतत्त्वावर घेण्यासंबंधी भाडेकरारनाम्यास मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:- भाडेक २०२३/ई.७४०६४३/विशि-२**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ मे, २०२६.

**वाचा :-** १. शासन निर्णय, वित्त विभाग विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनिमय, भाग-२, दि.१७.०४.२०१५.
२. विद्यापीठाचे पत्र NLUM/FIN/०२/३७०(३)/२०१८/११४५, दि.०४.१२.२०२५.

**प्रस्तावना** :- महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई चे कामकाज तात्पुरत्या स्वरुपात एमटीएनएल, पवई येथील २ रा, ३ रा, ४ था व ६ वा माळ्यावर सुरु करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने शासन निर्णय दि.१६.०२.२०२४ अन्वये दि.१५.०२.२०२३ ते दि.१४.०२.२०२४ या कालावधीसाठी एमटीएनएल, सोबत झालेल्या भाडेकरारास मान्यता देण्यात आली आहे. तथापि सदरहु भाडेकरार कालावधी संपुष्टात आला असल्याने महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई यांनी एमटीएनएल सोबत, पवई येथील दुसरा, तिसरा, चौथा व सहावा मजला भाडेतत्त्वावर घेण्यासंबंधी भाडे करारनामा करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याची संदर्भ क्र.२ येथील पत्रान्वये विनंती केली आहे. सदर विनंतीच्या अनुषंगाने संदर्भ क्र.१ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागास असलेल्या अधिकारानुसार भाडेकरार करण्याच्या प्रस्तावास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई यांनी एमटीएनएल सोबत केलेल्या भाडेकरारास पुढील प्रमाणे मान्यता देण्यात येत आहे :-

| उद्देश | मजले | क्षेत्रफळ व दर | कालावधी | भाड्याची रक्कम |
|---|---|---|---|---|
| कार्यालयीन व शैक्षणिक वापर | एमटीएनएल, पवई २ रा, ३ रा, ४ था व ६ वा मजला | ४५९४०.८२ चौ.फु (प्रति चौ.फु रु.३०३.६ प्रति महिना) | दि.१५.०२.२०२५ ते दि.१४.०२.२०२८ | प्रति वर्ष<br>मूळ भाडे<br>रु.१६,७३,७१,५९५/-<br>१८% जीएसटी<br>३,०१,२६,८८७/-<br>रु.१९,७४,९८,४८२/-<br>(जीएसटी सह) |

२.	सदर भाडेकराराच्या मसुद्यात नमूद केलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करण्याची जबाबदारी कुलसचिव, महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई यांची राहील.

३.	सदरहू शासन निर्णय हा वित्त विभाग दि.१७.०४.२०१५ वित्तीय अधिकार नियमपुस्तिका १९७८ भाग-पहिला, उपविभाग - १, अनुक्रमांक १० महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिकेतील क्रमांक ११५ आणि महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम १९६५ मधील नियम १४७ (क) नुसार कार्यालयासाठी जागा भाड्याने घेण्यास व भाडे प्रदान करण्यास मंजूरी देण्यासाठी प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४.	उक्त प्रयोजनार्थ येणारा खर्च “मागणी क्र.- डब्ल्यू-२, प्रधानशीर्ष-२२०२-सर्वसाधारण शिक्षण, ०३-विद्यापीठीय व उच्च शिक्षण, १०२-विद्यापीठांना सहाय्य, -(००) (२१) विधी विद्यापीठाचा विकास (२२०२ जी ९५९), ३१ सहाय्यक अनुदाने” या लेखाशिर्षाखाली त्या-त्या आर्थिक वर्षातील मंजूर तरतुदीतून खर्ची टाकण्यात येईल.

५.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०५२७१७२२०३८८०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRATAP PANDURANG LUBAL

Digitally signed by PRATAP PANDURANG LUBAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=b0d6763338fc6cc4f7cf07ca60db7abc1cfac99c84ab1b5bfc0dae4609d631d0, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=AF6895C47A84066432F5BDD1F182B4163D880AC9BD8D24A198FD0E7310BBEB59, cn=PRATAP PANDURANG LUBAL
Date: 2026.05.27 17:22:59 +05'30'

**(प्रताप पां. लुबाळ)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री, (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय मुंबई
३. अपर मुख्य सचिव (वित्त), मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण), मंत्रालय, मुंबई.
५. सचिव (नियोजन), मंत्रालय, मुंबई.
६. महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
७. महालेखापाल, (लेखा परीक्षण) -२, महाराष्ट्र, नागपूर.
८. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. कुलसचिव, महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई..
१०. अवर सचिव (अर्थसंकल्प), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
११. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१३. निवड नस्ती (विशि-२), उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.